प्रकरण ३ रे

# भारतीय राष्ट्रीय काँग्रेस

१ ) प्रारंभीच्या संघटना

२ ) राष्ट्रवादाचा उदय

३ ) भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना

४ ) मवाळवाद्यांचे युग -

१ ) दादाभाई नौरोजी, २ ) फिरोजशहा मेहता,

३ ) महादेव गोविंद रानडे, ४ ) गोपाळकृष्ण गोखले

## १ ) प्रारंभीच्या संघटना :-

**काँग्रेसच्या स्थापनेपूर्वीच्या विविध संघटना व त्यांचे कार्य :** इ. स. १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ही अचानक उदयास आलेली संघटना नाही. तिच्या प्रत्यक्ष स्थापनेपूर्वी मुंबई, मद्रास व बंगाल प्रांतांत अनेक छोट्यामोठ्या संघटना कार्यरत होत्या. लोकमत जागृत करण्याचे काम त्या त्या संघटना करीत होत्या. या सर्व संघटनांचे नेते राष्ट्रभावनेने भारावलेले व पाश्चात्त्य विद्याविभूषित होते. या सर्व संघटनांच्या कार्याचा अंतिम परिणाम म्हणजे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना होय.

**१ ) ब्रिटिश इंडियन असोसिएशन ( १८५१ ) :-** १८३७ मध्ये द्वारकानाथ टागोर यांनी 'लॅण्डहोल्डर्स असोसिएशन' ही संघटना स्थापन केली होती. जमीनदार वर्गाच्या हितसंबंधांची जोपासना करणे हा या संघटनेचा हेतू होता. पहिल्या दोन वर्षांत तिने बरीच हालचाल केली होती; पण नंतर मागे पडत ६ वर्षांत ती संपुष्टात आली. जॉर्ज थॉम्पसन या टागोर कुटुंबाशी निकटचा संबंध असलेल्या ब्रिटिश इसमाने लंडन येथे 'ब्रिटिश इंडिया सोसायटी' ही संस्था १८३९ मध्ये स्थापन केली होती. १८५१ मध्ये या दोन्ही संस्थांचे एकत्रीकरण करून 'ब्रिटिश इंडियन असोसिएशन' ही संस्था उदयास आली. या संस्थेद्वारा बंगाली तरुणांना सार्वजनिक कार्याचे शिक्षण देण्यात आले. या संस्थेचे एक सदस्य हरिश्चंद्र मुखर्जी यांना 'हिंदू पॅट्रियट' या पत्रकातून ब्रिटिश सरकारवर कठोर टीका केली होती. या संस्थेच्या वतीने भारताच्या घटनात्मक व शासकीय धोरणांबाबत आपले निवेदन ब्रिटिश पार्लमेंटला पाठवले होते. या संघटनेने पुढील मागण्या केल्या.

१) सनदी सेवा समतेच्या तत्त्वावर खुल्या कराव्यात.

२) कायद्याच्या क्षेत्रात वर्णभेद असू नये.

३) प्रत्येक प्रांतात सरकार नियुक्त व लोकनिर्वाचित सदस्यांचे एक प्रातिनिधिक मंडळ असावे. ही संघटना फक्त वरच्या वर्गाचे हितसंबंध जपते असा आरोप या संघटनेवर झाला.

या संघटनेचे कार्य पुढे अर्धशतक चालले. तिचे नेतृत्व प्रथम डॉ. राजेंद्रलाल मित्र व रामगोपाल घोष यांनी केले होते.

**२ ) मद्रास नेटिव्ह असोसिएशन ( १८५२ ) :-** ब्रिटिश इंडियन असोसिएशनच्या धर्तीवरच ही संस्था १८५२ मध्ये मद्रास येथे स्थापन झाली. या संस्थेनेही कंपनी सरकारच्या गैरकारभारावर प्रकाश टाकणारे निवेदन पार्लमेंटला सादर केले होते. महसूल अधिकाऱ्यांकडून होणारे शेतकऱ्यांचे शोषण थांबवावे, शेतकऱ्यांवरील अवास्तव कर कमी व्हावेत अशी मागणी या संघटनेने केली. तसेच धरणे व कालवे बांधावेत, शिक्षण प्रसार करावा व स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन कराव्यात अशीही मागणी केली होती.

**३ ) ईस्ट इंडिया असोसिएशन ( १८६६ ) :-** दादाभाई नौरोजी यांनी उमेशचंद्र बॅनर्जी यांच्या सहकार्याने ही संघटना लंडन येथे ब्रिटिशांना भारतीय समस्यांची ओळख करून देण्याच्या हेतूने स्थापन केली होती. विलियन वेडरबर्न या सेवानिवृत ब्रिटिश अधिकाऱ्याने या संघटनेचे सदस्यत्व स्वीकारले होते. भारताविषयी सहानुभूती असणारांना संघटनेची द्वारे खुली होती. या संस्थेच्या नियमित बैठका होत, भारतीय प्रश्नांवर चर्चा होई व राजकीय सुधारणांच्या मागण्यांचे निवेदन ब्रिटिश पार्लमेंटला दिले जाई. या संघटनेच्या शाखा मुंबई, कलकत्ता व मद्रास येथे स्थापन झाल्या होत्या. या संघटनेच्या व्यासपीठावरून अनेक उदारमतवादी इंग्रजांनी भारताविषयी ब्रिटिश लोकमत जागृत करण्याचा प्रयत्न केला.

**४ ) पूना असोसिएशन ( १८६७ ) - पुणे सार्वजनिक सभा ( १८७० ) :-** 'पूना असोसिएशन' हे प्रारंभी या संघटनेचे नाव होते. ते बदलून 'पुणे सार्वजनिक सभा' असे १८७० मध्ये ठेवण्यात आले. गणेश वासुदेव जोशी (सार्वजनिक काका) हे या संस्थेचे आधारस्तंभ होते. प्रारंभी काही राजेरजवाडे या संस्थेचे पदाधिकारी होते. या संस्थेने भारतीय समस्यांवर प्रकाश टाकणारी व्याख्याने आयोजित केली होती. या सभेच्या व्यासपीठावरून भारताच्या आर्थिक परिस्थितीबाबत रानडे यांनी दिलेली व्याख्याने फारच गाजली. न्या. रानडे हे या संस्थेचे अनेक वर्षे सूत्रचालक व प्रेरणाशक्ती होते. या संस्थेने शेतकऱ्यांच्या समस्या, सरकारचे आर्थिक धोरण यावर अभ्यासपूर्ण लेख प्रसिद्ध केले होते. सार्वजनिक सभा ही लोकमान्य राजकीय संस्था बनली होती.

न्या. रानडे यांनी या सभेतर्फे सामाजिक व राजकीय जागृतीचे काम हाती घेतले. आर्थिक उन्नतीसाठी औद्योगिकीकरणाचा व स्वराज्याचा मंत्र या संस्थेने दिला. दुष्काळग्रस्तांना संघटनेने मदत केली. संस्थेने एक पाक्षिकही सुरू केले होते. स्वदेशी वस्तूंच्या वापराचा आग्रह संस्थेने धरला होता. पुढे १८९७ मध्ये या संघटनेची परवानगी काढून घेतली गेली तरी राजकीय हक्कांची जाणीव व त्यासाठी सनदशीर मार्गांच्या आंदोलनाचे प्रशिक्षण देणारी संस्था म्हणून पुणे सार्वजनिक सभेचे कार्य महत्त्वाचे होते. विशेषत: पश्चिम महाराष्ट्रात संस्थेच्या शाखा होत्या.

५ ) बॉम्बे असोसिएशन :- कलकत्ता प्रांताच्या मानाने मुंबई प्रांत संघटना/संस्था स्थापन करण्यात मागे होता. १८४८ मध्ये एल्फिन्स्टन महाविद्यालयात Student Literary and Scientific Association स्थापन झाली. मुंबईकरांना सार्वजनिक जीवनात भाग घेण्याचे एक साधन प्राप्त झाले. १८५२ मध्ये Bombay Association स्थापन झाली. नाना शंकरशेठ, डॉ. भाऊ दाजी, नौरोजी वगैरेंचा या संस्थेत पुढाकार होता. नौरोजी म्हणत, ब्रिटिश राज्यात आमच्यावर जुलूम होत नसला तरी युरोपियन अधिकाऱ्यांना भारतातील परिस्थिती व परंपरा यांची माहिती नसल्याने त्यांनी काढलेल्या कायद्याने लोकांच्या भावना दुःखी होतात. म्हणून कायद्याचा मसुदा तयार झाल्यानंतर सूचना करण्याचे काम बॉम्बे असोसिएशनकडे द्यावे. पण ही सूचना विचारात घेतली गेली नाही. सनदशीर मार्गाने जनतेच्या अडचणी व मागण्या सरकारपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न या संघटनेने केला. या संघटनेने रयतेच्या गाऱ्हाण्यांबाबत मुंबई, ठाणे, पुणे येथील ४००० प्रतिष्ठित लोकांच्या सह्यांचा अर्ज ब्रिटिश पार्लमेंटला पाठविला होता. (१८५२) १८५३ च्या अशाच एका दुसऱ्या अर्जावर ४००० सह्या होत्या. १८७० मध्ये मिठावर करात व उत्पन्न कराच्या वाढीविरुद्ध या संघटनेने ४००० लोकांच्या सह्यांचा अर्ज ब्रिटिशांकडे पाठविला होता. मुंबई प्रांतातील ही पहिलीच राजकीय संघटना होय. या संघटनेच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे होत्या.

१) धर्म, जन्म, भूमी, वंश अथवा शरीराचा रंग न पाहता सरकारी नोकऱ्या मिळाव्यात.

२) मुंबई नगरपालिका असावी, ब्रिटिश संसदेत हिंदी प्रतिनिधी असावेत.

३) युनिव्हर्सिट्यांची स्थापना व्हावी.

४) दळणवळणाच्या साधनांत वाढ व्हावी.

५) लोकांना कल्याणकारी ठरतील असे कायदे सरकारने करावेत.

६) युरोपियन अधिकाऱ्यांवरचा खर्च कमी करावा.

७) राज्यकारभारात गुप्तता नसावी.

८) इंडिया कौन्सिल ब्रिटनमध्ये स्थापन केले जावे.

९) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारात भारतीयांना संधी द्यावी.

६ ) बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन :- जानेवारी १८८५ मध्ये न्या. तेलंग, फिरोजशहा मेहता व तय्यबजी यांनी ही संस्था मुंबई शहरात बैठक घेऊन स्थापन केली. भारतीय प्रश्नांची चर्चा करून लोकमत जागृत करणे, जनतेच्या मागण्या निवेदन, अर्ज, विनंत्या याद्वारा सरकारला सादर करणे हे या संस्थेचे उद्दिष्ट होते. दादाभाई नौरोजी यांचाही या संस्थेला आशीर्वाद होताच. बद्रुद्दीन तय्यबजी, फिरोजशहा मेहता व न्यायमूर्ती तेलंग ही त्रिमूर्ती तिची संस्थापक होती.

७ ) मद्रास महाजन सभा ( १८८४ ) :- मद्रास शहरात ही राजकीय संस्था १८८४ मध्ये स्थापन झाली. रंगय्या नायडू, सुब्बाराव पंतलू, सुब्रमण्यम् अय्यर, आनंद चारुलू ही मंडळी या संस्थेची संस्थापक होती. १८८५ मध्ये या सभेने एक परिषद भरवून विधिमंडळास

व्यापक रूप द्यावे, कार्यकारी व न्यायशाखेचे अधिकार वेगवेगळे असावेत अशी मागणी केली होती.

**८ ) इंडिया लीग ( १८७५ ) :-** 'अमृत बाझार'चे संपादक शिरीषकुमार घोष यांनी 'इंडिया लीग' ही संस्था स्थापन केली. राजकीय जागृती घडवून आणण्याचा यशस्वी प्रयत्न या संघटनेने केला; पण 'इंडिया असोसिएशन' या संस्थेचा उदय झाल्याने 'इंडिया लीग'चे महत्त्व कमी झाले. 'इंग्लिशमन' या कलकत्त्यातील एका वृत्तपत्राने 'भारतीय जनतेतील राजकीय जागृतीचा आविष्कार प्रथमच स्पष्ट करणारी संघटना' असा या संस्थेचा उल्लेख केला.

**९ ) गोविंद बाबाजी जोशी ( वसईकर ) व त्यांच्या संघटना १८२६-१९०६ ) :-** गोविंद बाबाजी जोशी (वसईकर) यांनी १८६२ मध्ये वसई असोसिएशन व १८६८ मध्ये ठाणे जिल्हा असोसिएशन या दोन संस्था स्थापन केल्या होत्या. पण त्या दोन्ही संघटनांना पैशाचे पाठबळ नव्हते. १८५७ च्या उठावानंतर अबकारी कर, आयकर, स्टँप कर, मिठावरचा कर ब्रिटिशांनी लावले होते. या पार्श्वभूमीवर या दोन संघटना स्थापन झाल्या होत्या. तुटपुंज्या साधनसामग्रीमुळे १८७० मध्ये ठाणे असोसिएशन बंद पडली. पण अहमदाबाद, नाशिक, नांदगाव असोसिएशन्स सुरू करण्यात त्यांचा पुढाकार होता.

त्यातील पहिली संस्था स्थानिक-ग्रामीण पातळीवर होती, तर दुसरी जिल्हा पातळीवर होती. महाराष्ट्रात १८५७ च्या उठावानंतर अनेक मध्यमवर्गीय कार्यकर्ते स्वदेशीचा प्रसार करीत. छोट्या व गृहोपयोगी वस्तूंचे उत्पादन करीत. त्यात वसईच्या गोविंद बाबाजी जोशी यांचे कार्य उल्लेखनीय होते. त्यांची 'सार्वजनिक पे फंड'ची योजना व त्यावरील पुस्तिका (१८७३) ही भावी काळातील पैसा-फंड, योजनेची गंगोत्री म्हटली पाहिजे. गोविंद बाबाजी जोशींच्या 'वसई असोसिएशनने' १८६२ मध्ये सहकारी पतपेढीचा प्रयोग केला होता. महाराष्ट्रातील किंबहुना हिंदुस्थानातील ही पहिली सहकारी पेढी असावी असे मत संशोधक मांडतात. महाराष्ट्रात नंतर ज्या राजकीय व सामाजिक संघटना स्थापन झाल्या त्याची पायाभरणी गोविंद बाबाजी जोशी यांच्या वरील दोन संघटनांनी केली. आर्थिक स्थित्यंतराविषयी मध्यमवर्ग जागरूक झाला होता हे गोविंद बाबाजी जोशी यांच्या कार्यातून स्पष्ट होते.

**१० ) इंडिया असोसिएशन ( १८७६ ) :-** काँग्रेसच्या स्थापनेपूर्वी ज्या संघटना स्थापन झाल्या होत्या त्यात सर्वात महत्त्वाची ही संघटना आहे. सुरेंद्रनाथ बॅनर्जी तिचे संस्थापक होते. त्यांनी संपूर्ण भारताचा दौरा करून जनमत जागृत करण्याचा प्रयत्न केला. आनंद मोहन घोष सरचिटणीस होते. सुशिक्षित मध्यमवर्गीयांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम या संस्थेने केले. देशात प्रबळ लोकमत तयार करणे, समान राजकीय हितसंबंधांच्या भारतातील भिन्न जातींच्या व वंशांच्या लोकांचे ऐक्य घडवून आणणे, हिंदू-मुस्लिम यांच्यात ऐक्य घडवून आणणे ही या संस्थेची उद्दिष्टे होती. लॉर्ड लिटनने स्पर्धात्मक परीक्षांसाठीच्या वयाची मर्यादा २१ वरून १९ केल्याने मध्यमवर्गीय तरुण या संघटनेच्या व्यासपीठावर एकत्र

आले. १८७९ मध्ये राजकीय जागृतीचे माध्यम म्हणून 'बंगाली' हे वृत्तपत्र प्रकाशित करण्यात आले.त्यातून ब्रिटिश सरकारवर टीका केली जाई. डिसेंबर १८८३ मध्ये भारतातील विविध प्रांतांच्या प्रतिनिधींची राष्ट्रीय परिषद या संघटनेने कलकत्ता येथे आयोजित केली होती. या परिषदेस १०० प्रतिनिधी हजर होते. या परिषदेने मुलकी सेवेत भारतीयांना प्रवेश द्यावा, कार्यकारी शाखा व न्यायशाखा एकमेकांपासून वेगळ्या असाव्यात या मागण्या केल्या होत्या. या परिषदेचे दुसरे अधिवेशन २५ ते २७ डिसेंबर १८८५ रोजी कलकत्ता येथे भरले. डिसेंबर १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना होताच या संघटनेने आपले स्वतंत्र अस्तित्व विसर्जित करून काँग्रेसला जाऊन मिळण्याचा निर्णय घेतला. या दोन अधिवेशनामागे सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांचे सामर्थ्य व कल्पनाशक्ती होती. राष्ट्रीय चळवळीसाठी एक राष्ट्रीय निधी स्थापन करण्याचा घेण्यात आलेला निर्णयही अत्यंत महत्त्वाचा होता. राष्ट्रीय परिषदेची वरील दोन अधिवेशने राष्ट्रीयत्वाच्या जाणिवेचा महत्त्वाचा आविष्कार होता. राष्ट्रीय परिषदेचे आयोजन हे राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेची पहिली पायरी होय. The objects of the National Conference was not sectional nor regional but truly national."

## २) भारतातील राष्ट्रवादाचा उदय व विकासाची कारणे :-

**भारतीय राष्ट्रवाद :-**

इ.स . १६०० मध्ये इंग्लंडची राणी एलिझाबेथने ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीला पूर्वेकडील राष्ट्रांत व्यापार करण्याची सनद दिली. एका हातात तराजू व दुसऱ्या हातात तलवार घेऊन या कंपनीने १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत संपूर्ण भारत ब्रिटिशांच्या वर्चस्वाखाली आणला. १७५७ च्या प्लासीच्या युद्धाने भारतात ब्रिटिशांच्या सत्तेची मुहूर्तमेढ रोवली गेली. १७५७-१८५७ या १०० वर्षांत रॉबर्ट क्लाईव्ह, वॉरन हेस्टिंग्ज, लॉर्ड वेलस्ली, लॉर्ड हेस्टिंग्ज, लॉर्ड डलहौसी वगैरे ब्रिटिश ग. ज. ने भारतात ब्रिटिश सत्तेच्या विस्ताराचे काम पूर्ण केले. लॉर्ड डलहौसीने संस्थाने खालसा करण्याचे धोरण आखून सातारा, झाशी नागपूर, संबळपूर, अवध वगैरे संस्थाने खालसा केली. ब्रिटिश सत्तेविरुद्ध भारतीयांच्या मनात जो राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व लष्करी असंतोष होता त्याची प्रतिक्रिया म्हणजे १८५७ चा उठाव होय. हा उठाव ब्रिटिशांनी मोडून काढला. हा उठाव अयशस्वी झाला असला तरी १८५८ मध्ये इंग्लंडच्या राणीने एक जाहीरनामा काढून काही धोरणात्मक निर्णय घेतले. ईस्ट इंडिया कंपनी बरखास्त करून भारताचा कारभार ब्रिटिशांनी आपल्या हाती घेतला. हिंदी लोकांच्या धार्मिक व सामाजिक जीवनात हस्तक्षेप केला जाणार नाही, ख्रिश्चन धर्माची सक्ती केली जाणार नाही; साम्राज्यविस्तार केला जाणार नाही व पात्रतेनुसार नोकऱ्या देऊ असे जाहीरनाम्यात घोषित केले गेले.

ब्रिटिशांच्या वसाहतवादास प्रारंभापासूनच भारतीयांकडून विरोध होत होता. हा विरोध राजेरजवाडे, संस्थानिकांचा लष्करी प्रतिकार तर कधी सैनिक, आदिवासी, शेतकरी वर्गांच्या

बंडाळ्यांच्या रूपाने प्रकट झाला होता. परंतु हा विरोध असंघटित, स्थानिक स्वरूपाचा व राष्ट्रीयत्वाचा अभाव असलेला होता. १८५७ च्या उठावाने ब्रिटिश सत्ता ही मुळापासून हादरली. १८५७ नंतरही ब्रिटिशांविरुद्ध छोटे मोठे उठाव होतच राहिले; पण ते सर्व ब्रिटिशांनी मोडून काढले. सशस्त्र प्रतिकाराऐवजी सनदशीर मार्गाने, संस्थात्मक व्यासपीठाच्या माध्यमातून ब्रिटिशांना विरोध करावा या हेतूने भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा जन्म झाला. १८८५-१९४७ या काळात भारतीय राष्ट्रीय लढ्याचे नेतृत्व काँग्रेसने केले. त्यामुळेच भारतीय स्वातंत्र्यलढा म्हणजे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस असे समीकरणच झाले. भारतातील प्रशासकीय सेवेतील एक निवृत्त अधिकारी जॉन स्ट्रेचीने म्हटले, 'भारतासंबंधी सर्वप्रथम व सर्वात आवश्यक जाणून घेण्यासाठी गोष्ट म्हणजे भारत अस्तित्वात नाही व कधीच नव्हता.... भारत कधीही एक राष्ट्र बनणार नाही.'

१९ व्या शतकाच्या मध्यास भारतात निर्माण झालेला राष्ट्रवाद हा आकस्मिक झालेला अपघात नव्हता तर त्यामागे मोठी कारण परंपरा होती. भारतातील विविध प्रांतांतील विविध भाषीय लोक हे हिंदुस्थानचे नागरिक आहेत; आपण सर्व भारतीय आहोत व ब्रिटिश लोक परकीय असून त्यांनी आपले सर्व प्रकारचे स्वातंत्र्य हिरावून घेतले आहे; ते आपले शोषण करतात ही राष्ट्रवादाची जाणीव भारतात निर्माण झाली. भारतीय राष्ट्रवाद म्हणजे इंग्रज सत्तेचे अपत्य होय, असे आर कुपलंड यांनी म्हटले होते. पण भारताचा राष्ट्रवाद इंग्लंडच्या इच्छेविरुद्धचे अपत्य होते हे मात्र नक्कीच. राष्ट्रवादाच्या उदयातूनच राष्ट्रीय सभेची स्थापना होऊन ती गतिमान व सक्रिय बनत गेली. राष्ट्रवादाचा उदय व विकासाला खालील घटक कारणीभूत होते.

**१ ) ब्रिटिशांचे साम्राज्यविस्ताराचे धोरण व राजकीय ऐक्य :-** १७५७-१८५७ या काळात भारतातील ब्रिटिशांच्या साम्राज्यविस्ताराची प्रक्रिया पूर्ण झाली. वेलस्लीची 'तैनाती फौज' पद्धत व लॉर्ड डलहौसीचे 'खालसा धोरण' याचा परिणाम म्हणून ब्रिटिश सत्तेला भारतात सार्वभौमत्व प्राप्त झाले. संपूर्ण भारतात ब्रिटिशांचे एकछत्री राज्य निर्माण झाले. राजकीय एकसंघतेमुळे व प्रादेशिक संलग्नतेमुळे राष्ट्रवादास पोषक वातावरण निर्माण झाले. ब्रिटिशपूर्व काळात विविध प्रांतांत वेगवेगळे सत्ताधीश व त्यांच्यात संघर्ष व युद्धे होत असल्याने आपला प्रांत म्हणजेच राष्ट्र अशी संकुचित भावना झाली होती; परंतु ब्रिटिशांच्या नेतृत्वाखाली राजकीय ऐक्य प्रस्थापित झाल्याने आपण एकाच सम्राटाचे प्रजानन आहोत अशी भावना निर्माण झाली. **पं. नेहरूंच्या मते,** 'राजकीय ऐक्यामुळे राजकीय ऐक्य व राष्ट्रीय जागृती निर्माण झाली.'

**२ ) प्रशासकीय ऐक्य :-** ब्रिटिशांनी प्रादेशिक विस्ताराबरोबरच संपूर्ण भारतात एकच प्रशासन यंत्रणा निर्माण केली. सर्व भारतीयांसाठी समान कायदा, शांतता व सुव्यवस्था, समान न्याययंत्रणा निर्माण केली. भिन्न भाषिक व भिन्न प्रांतिक भारतीय एका समान प्रशासकीय सूत्रात बांधले गेले. समान न्यायपद्धती, समान चलन व्यवस्था, समान अर्थनीती

निर्माण झाली. या प्रशासकीय ऐक्यामुळे एकराष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण झाली. ग्रिफिथ या ब्रिटिश इतिहासकाराने यासंदर्भात म्हटले आहे, 'ब्रिटिश शासन काळात भारतीयांवर कुशल आणि शक्तिशाली शासनाचा प्रभाव पडला, ज्यामुळे विभिन्न क्षेत्रांत एकता निर्माण झाली. जाती, धर्म, भाषा व सामाजिक स्थिती यातील विभिन्नतेमुळे जरी वेगळेपण कायम राहिले तरी एकाच सरकारच्या नियंत्रणामुळे भारतीयांत एकसूत्रता निर्माण होण्यास सुरुवात झाली.'

**३ ) इंग्रजी भाषा :-** इ.स. १८३५ पासून भारतात ब्रिटिशांनी इंग्रजीतून शिक्षण देण्यास प्रारंभ केला. इंग्रजी भाषा आत्मसात केलेल्या भारतीयांना पाश्चात्त्य विचारवंतांच्या विचारांची ओळख झाली. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, उदारमतवाद, मानवतावाद आदी संकल्पनांची ओळख इंग्रजी भाषेमुळेच भारतीयांना होऊ शकली. वास्तविक इंग्रजी शिक्षण ब्रिटिशांनी भारतात त्यांच्या सोयीसाठी, गरजेसाठी सुरू केले होते. इंग्रजी भाषा जाणणारे व कमी पगारावर काम करणारे कारकून ब्रिटिशांना प्रशासन यंत्रणेत मोठ्या प्रमाणावर हवे होते. ब्रिटिशांनी त्यांच्या गरजेसाठी म्हणून सुरू केलेले शिक्षण भारतीयांना उपकारक ठरले. म्हणूनच **आशुतोष मुखर्जी, के. एम. पण्णीकर** या विद्वानांनी इंग्रजीला 'भारतीय स्वातंत्र्याची भाषा' या शब्दांत गौरविले आहे. **विष्णुशास्त्री चिपळूणकर** यांनी 'इंग्रजी शिक्षण हे लढाऊ राष्ट्रवादाचे बाळकडू पाजणारे वाघिणीचे दूध होय' असे म्हटले. इंग्रजी भाषेमुळे पाश्चात्त्य ज्ञानाची भारतीयांना ओळख झाली. भारतातील विविध प्रांतांतील मंडळी जेव्हा एकत्र आली तेव्हा त्यांनी इंग्रजीतूनच विचारविनिमय केला, त्यामुळे राष्ट्रवादाची वाढ झपाट्याने होण्यास मदत झाली. **दादाभाई नौरोजी म्हणतात**, 'भारतीय लोकांना केवळ इंग्रजी शिक्षणामुळेच नवीन प्रकाश मिळाला. इंग्रजी संस्कृतीपासून आम्ही हे शिकलो की सरकार प्रजेसाठी असते, प्रजा सरकारसाठी नसते.' इंग्रजी भाषेमुळेच सुशिक्षित भारतीयांना, ज्यांनी प्रारंभीच्या काळात स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व केले, त्यांना विचारांची देवाणघेवाण करणे, परस्परांशी संपर्क साधणे, देशाच्या हिताची चर्चा करणे शक्य झाले. प्रारंभीच्या काळात काँग्रेसच्या अधिवेशनातही इंग्रजी भाषेचाच वापर केला जाई. **रवींद्रनाथ टागोर यांनी** म्हटले होते, 'इंग्रजी लेखकांचे वैचारिक लिखाण मानवतावाद, स्वातंत्र्य, न्याय यांची चर्चा करणाऱ्या ग्रंथांच्या वाचनाने भारतीयांत नवीन उत्साह निर्माण झाला.'

**४) पाश्चात्त्य शिक्षण :-** लॉर्ड बेटिंकने भारतात पाश्चात्त्य शिक्षण देण्यास सुरुवात केली. इंग्रजी माध्यमाच्या शाळा व महाविद्यालये १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात मोठ्या शहरांतून सुरू झाली. १८५८ मध्ये मुंबई, कलकत्ता व मद्रास येथे पाश्चात्त्य विद्यापीठांच्या धर्तीवर विद्यापीठे सुरू झाली. त्यामुळे पाश्चात्त्य शिक्षणास गती प्राप्त झाली. पाश्चात्त्य शिक्षणामुळेच पाश्चात्त्य विचारवंतांच्या तत्त्वज्ञानाची ओळख भारतीयांना झाली. राष्ट्रवाद, लोकशाही, समता, व्यक्तिस्वातंत्र्य या संकल्पनांची ओळख झाली. पाश्चात्त्य शिक्षणामुळेच अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध, फ्रेंच राज्यक्रांती, इटली व जर्मनीचे एकीकरण, ग्रीस व आयर्लंडचा

स्वातंत्र्य लढा आदी घटनांची माहिती मिळाली. इंग्लंडच्या राजकीय व आर्थिक वसाहतवादाचे स्वरूप भारतीयांना कळून चुकले. पाश्चात्त्य शिक्षणामुळेच पाश्चात्त्य राष्ट्रांनी भौतिक, औद्योगिक, शास्त्रीय व तांत्रिक क्षेत्रांत केलेल्या प्रगतीची ओळख भारतीयांना झाली. पाश्चात्त्य शिक्षणामुळेच इंग्लंडमधील उदारमतवाद, राजकीय विचारप्रणाली व शासन व्यवस्था, इंग्लंडमधील स्थानिक स्वराज्य संस्था व जबाबदार शासन पद्धती इत्यादीची ओळख भारतीयांना होऊ शकली. जे भारतीय उच्च शिक्षणासाठी इंग्लंडमध्ये गेले होते त्यांना ब्रिटिशांचा दुटप्पीपणा लक्षात आला. पाश्चात्त्य शिक्षणामुळेच सुशिक्षित भारतीयांत शास्त्रीय दृष्टिकोन, तर्कनिष्ठा, बुद्धिप्रामाण्यवाद निर्माण झाला. पाश्चात्त्य शिक्षणामुळेच पाश्चात्त्य राष्ट्रांशी भारताची तुलना सुशिक्षित लोक करू लागले, आत्मपरीक्षण करू लागले. त्यातून राष्ट्रवादाची भावना हळूहळू विकास पावत गेली. पण बिपिनचंद्र यांना हे मत मान्य नाही. मॉडर्न इंडिया या ग्रंथात ते लिहितात, 'आधुनिक शिक्षण पद्धतीमुळे राष्ट्रीय चळवळ निर्माण झाली नाही. ती ब्रिटिश व भारत यांच्यातील हितसंबंधांच्या संघर्षातून पुढे आली हे लक्षात घेतले पाहिजे.'

**५ ) मध्यमवर्गाचा उदय :-** ब्रिटिशपूर्व काळात व प्रारंभीच्या ब्रिटिश राजवटीतही जमीनदार, सधन शेतकरी, व्यापारी, सावकार, भिन्न व्यावसायिक हे वर्ग समाजात होते. परंतु इंग्रजी शिक्षण, पाश्चात्त्य शिक्षण पद्धती व इंग्रजी जाणणाऱ्या भारतीयांना नोकऱ्यांत संधी देण्याचे धोरण यामुळे भारतात मध्यमवर्गाचा उदय झाला. हा वर्ग शहरांत राहणारा, नवे विचार, ज्ञान व जीवनमूल्ये यांचा स्वीकार करणारा होता. ब्रिटिशांचे आर्थिक शोषण, मूलभूत हक्कांची गळचेपी याविरुद्ध हाच वर्ग पुढे आला. शासनाच्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे व राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व करण्याचे काम याच वर्गाने केले. मध्यमवर्ग हाच भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा कणा होता. व्यापार, उद्योग, सरकारी नोकरी, स्वतंत्र व्यवसाय यांच्या वाढीतून मध्यमवर्ग वाढत होता. काँग्रेसच्या रूपाने तो संघटित होण्यास मदत झाली होती. ब्रिटिश राज्यकर्त्यांना या वर्गाशी संबंध ठेवणे अटळ होते. **लॉर्ड नॉर्थब्रुक** (१८७२-७६) ने भारतमंत्र्याला केलेल्या तक्रारीत म्हटले होते, 'थोडे फार इंग्रजीचे ज्ञान मिळवलेला वर्ग येथे वाढत आहे. यामुळे हा वर्ग अहंकारी बनला असून सरकारने केलेल्या प्रत्येक गोष्टीबद्दल तक्रार करण्याची इंग्रजांची सवय त्यास जडली आहे.'

**६ ) सामाजिक व धार्मिक प्रबोधन :-** पाश्चात्त्य शिक्षण घेतलेल्यांना भारतीय समाजाची पुनर्रचना झाली पाहिजे असे वाटू लागले. भारतातील सामाजिक व धार्मिक जीवनातील दोष, उणिवा यांची तीव्र जाणीव त्यांना झाली. त्यातूनच १९ व्या शतकाच्या प्रारंभापासूनच प्रबोधनास प्रारंभ झाला. 'भारतीय प्रबोधनाचे पिता' या शब्दांत राजा राममोहन रॉय यांचा उल्लेख केला जातो. १८२८ मध्ये रॉय यांनी ब्राह्मो समाज स्थापन केला. एकेश्वरवादाचा प्रचार, मूर्तिपूजेला विरोध, सतीप्रथेस विरोध, आंतरजातीय व विधवा विवाहांचा पुरस्कार ब्राह्मो समाजाने केला. पं. ईश्वरचंद विद्यासागर यांनीही बंगालमध्ये समाजसुधारणेचे कार्य केले. महाराष्ट्रात १८६७ मध्ये डॉ. भांडारकर, न्या. रानडे, डॉ. आत्माराम पांडुरंग यांनी

झाला. त्यामुळे भारतीय शेतमजुरांचे शोषण झाले. भारतातील हस्तव्यवसाय बसले. इंग्लंडमधील कारखान्यांत तयार होणारे कापड विकल्याने भारतातील कापड व्यवसाय पूर्णपणे बसला. जमीन महसूल व अन्य करांच्या रूपाने कोट्यवधी रुपये संपत्ती जमा केली. कार्ल मार्क्सने १८५३ मध्ये लिहिलेल्या लेखात ब्रिटिश वसाहतवादाचा भारतावर झालेला अनिष्ट परिणाम स्पष्ट केला होता. **दादाभाई नौरोजी** यांनी आपल्या भाषणांतून व लिखाणातून इंग्लंड करोडो रुपयांची संपत्ती भारतातून दरवर्षी लुटून नेत आहे. ती संपत्ती मोहम्मद गझनीच्या १८ स्वाऱ्यांतील संपत्तीहून अधिक आहे हे साधार सिद्ध केले. **हेन्री कॉटन व विलियम हंटरच्या मते**, 'मोगलांच्या काळात संपन्न असलेला हा देश १०० वर्षांच्या ब्रिटिशांच्या राजवटीत दारिद्र्याच्या गर्तेत लोटला गेला.' **विलियम डिग्बी** या ब्रिटिश अधिकाऱ्याने सात कोटी लोक दारिद्र्य व उपासमारीने त्रस्त आहेत अशी कबुली दिली होती. ब्रिटिश राजवटीत लघुउद्योग व हस्तव्यवसाय बंद पडल्याने कारागिरांचा फार मोठा वर्ग बेकार झाला होता. त्यास ब्रिटिशच जबाबदार होते. **रजनी पामदत्त** यांनी 'इंडिया टुडे' या ग्रंथात भारतातील राष्ट्रीय चळवळ ही ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणांमुळेच उदयास आली असे म्हटले आहे. भारतातील ग. ज., प्रांताचे गव्हर्नर,इतर मुलकी व लष्करी सेवेतील ब्रिटिश अधिकारी यांना जे प्रचंड वेतन मिळे ते भारताच्या तिजोरीतूनच दिले जात असे.

**८ ) ब्रिटिशांचे वंशद्वेषाचे धोरण :-** ब्रिटिश राज्यकर्ते ब्रिटिशांना सांस्कृतिक व वांशिकदृष्ट्या श्रेष्ठ व भारतीयांना कमी दर्जाचे समजत. गोऱ्या व्यक्तीला नमस्कार करण्याची जणू सक्तीच होती. पहिल्या वर्गातून प्रवास करणाऱ्या भारतीय व्यक्तीला सामान्य ब्रिटिशही बाहेर काढीत. ब्रिटिश न्यायाधीश न्यायदान करताना ब्रिटिश व भारतीय माणूस असा भेद करत. गंभीर गुन्हा करूनही त्यांना होणाऱ्या शिक्षा सामान्य असत. प्रशासनातील उच्च पदे भारतीयांना मुद्दामच दिली जात नव्हती. लॉर्ड डलहौसी, लॉर्ड हेस्टिंग्ज यांनी प्रशासनातील भारतीय व्यक्तींच्या एकूण कार्यक्षमतेबद्दल जाहीरपणे शंका व्यक्त केली होती. भारतीयांना गोरे ब्रिटिश 'काळे' म्हणून हिणवत. हॉटेल्स व करमणूक केंद्रांवर 'भारतीय व कुत्री यांना प्रवेश नाही' अशा पाट्या लावलेल्या असत. वंशद्वेषाच्या या धोरणामुळे भारतीयांची अस्मिता, स्वाभिमान जागा झाला व अन्यायाविरुद्ध लढा देण्यासाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेतृत्व त्यांनी मान्य केले. १८७७ मध्ये डिग्बी या नावाचा निरीक्षक लिहितो, 'युरोपियन्स हिंदुस्थानच्या लोकांना वाईट वागणूक देतात आणि एतद्देशीयांबरोबरचे त्यांचे वर्तन अनादर व उद्धटपणा दाखवणारे असते.' **डॉ. डी. सी. हॉल** या अमेरिकन व्यक्तीने हिंदुस्थानात सगळीकडे प्रवास केल्यानंतर लिहिले, 'ज्यांना मी मोठ्या सन्मानाने माझे स्नेही मानतो त्या अतिशय बुद्धिमान आणि थोर व्यक्तिमत्त्व असलेल्या गृहस्थांना इंग्लिश माणसांनी अतिशय बेअबदीची वागणूक दिलेली मी पाहिली आहे.' **१८३३ मध्ये हिंदुस्थानात सर्वदूर प्रवास करून आलेला डब्ल्यू. एस. ब्लंट लिहितो**, 'बंगाल आणि उत्तर हिंदुस्थानात कोणत्याही दर्जाचा, वयाचा आणि व्यक्तिमत्त्वाचा एतद्देशीय गृहस्थ हा इंग्रज माणसे नेहमी जात असलेल्या ठिकाणी प्रवेश करू शकत नाही आणि तो तसा गेला तर अपमान व धाकदपटशा यास तोंड द्यावे लागते.'

९) भारतीय वृत्तपत्रे - १९ व्या शतकात ब्रिटिशांकडून भारतीय लोकांवर होणाऱ्या अन्यायास वाचा फोडण्याचे काम वृत्तपत्रांनी केले. १८७० पर्यंत भारतातील विविध प्रांतीय भाषांतून ३७४ वृत्तपत्रे निघत होती. मुंबई प्रांतात 'ज्ञानप्रकाश', 'केसरी', 'खानदेश', 'वैभव', 'मराठा', 'काळ' ही वृत्तपत्रे निघत होती. बंगालमधून 'हिंदू पेट्रियट', 'बंगाली', 'इंडियन मिरर', 'अमृत बजार पत्रिका' निघे. मद्रासमधून 'द हिंदू' निघे. या सर्व वृत्तपत्रांनी ब्रिटिशांच्या राजकीय व आर्थिक नीतीवर जाहीर टीका करून भारतीयांना जागृत करण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य केले. पाश्चात्य शिक्षणाच्या प्रसाराबरोबर या वृत्तपत्रांच्या संख्येत वाढ होत गेली. भारतीय नेत्यांनी स्वत: वृत्तपत्रे चालविली. रॉय यांचे 'संवाद कौमुदी', अरविंद घोष यांचे 'वंदे मातरम्' लाला लजपतराय यांचे 'द पीपल' टिळकांचे 'केसरी' व 'मराठा' या वृत्तपत्रांचा त्यात प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. या सर्व वृत्तपत्रांनी राजकीय स्वातंत्र्याचा पुरस्कार करून राष्ट्रवादाच्या विकासाला हातभार लावला. लोकमान्य टिळक अनेक वेळा असा दावा करत की वृत्तपत्र व भाषण स्वातंत्र्य राष्ट्राला जन्म देते आणि त्याचे संगोपन करते. १८७७ मध्ये मुंबई प्रांतात ६२, दक्षिण भारतात २०, बंगाल प्रांतात २८, उत्तर प्रांतात ६५ अशा संख्येने वृत्तपत्रे निघत होती. वृत्तपत्रांच्या वाचकवर्गातही वाढ होत होती. वृत्तपत्रांनी विचार जागृतीचे जे कार्य केले त्यामुळे राष्ट्रवादाची ज्योत प्रज्वलित होण्यास मदत झाली. वृत्तपत्रांशिवाय राष्ट्रवादाच्या निर्मितीत नियतकालिकांचेही योगदान महत्त्वाचे होते. 'बंगाल गॅझेट', 'मुंबई समाचार', 'चंद्रिका', 'रास्त गोफ्तर', 'मिराते अखबार', 'दर्पण', 'ज्ञानप्रकाश', 'प्रभाकर' आदी नियतकालिकांची राष्ट्रवादाच्या निर्मितीत महत्त्वाची भूमिका होती. मराठी साहित्यात विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची 'निबंधमाला' राष्ट्रवादाची प्रेरणा देणारी होती.

१०) **भारतीय साहित्य :-** १९ व्या शतकात वृत्तपत्रांप्रमाणेच साहित्यिकांनी राष्ट्रीयत्वाची भावना जागृत करण्याचे महत्त्वाचे काम केले. बंगालमध्ये बंकीमचंद्र चटर्जी, दीनबंधू मित्र, रवींद्रनाथ टागोर, ईश्वरचंद्र विद्यासागर; अल्ताफ हुसेन अली, तामिळी भाषेत सुब्रमण्यम भारती, हिंदी भाषेत भारतेन्द्रू हरिश्चंद्र, महाराष्ट्रात लोकहितवादी, विष्णुशास्त्री चिपळूणकर, शि. म. परांजपे, श्रीपाद कोल्हटकर यांनी राष्ट्रप्रेम जागे करणारे लिखाण केले. बंकीमचंद्र चटर्जी यांच्या 'आनंदमठ' या कादंबरीतील 'वंदे मातरम' हे गीत स्वातंत्र्य चळवळीच्या काळातील घोषगीत ठरले. टागोरांच्या काव्याने बंगाल राष्ट्रच बनला असे म्हटले जाते. इंग्रजी भाषेतील विचारप्रवर्तक ग्रंथांची भाषांतरे प्रादेशिक भाषांत मोठ्या प्रमाणात करण्यात आली. भारताला प्राचीन इतिहास आहे व संस्कृतीही श्रेष्ठ आहे हे दाखवून देणारे ग्रंथही प्रकाशित झाले. वि. का. राजवाडे, ग. ह. खरे, पारसनीस या इतिहासकारांनी परकियांनी लिहिलेला इतिहास कसा विकृत, चुकीचा आहे हे दाखवून दिले. प्रस्तुत नमूद साहित्यकारांच्या साहित्याने राष्ट्रवादाच्या प्रसाराचे महत्त्वाचे कार्य केले. भारतातील सर्वच प्रादेशिक भाषांमधून राष्ट्रप्रेम जागृत करणारे साहित्य या काळात तयार झाले.

**११ ) प्लेग व दुष्काळाकडे दुर्लक्ष :-** ब्रिटिश राजवटीत प्लेग व दुष्काळाने वारंवार थैमान घातले. १८७८, १८८९, १८९२, १८९६-९७ व १८९९-१९०० या वर्षी भीषण दुष्काळ पडून व प्लेगच्या साथीने लक्षावधी लोक मृत्यू पावले. तत्पूर्वी लॉर्ड लिटनच्या काळातही प्लेग व दुष्काळात मोठ्या प्रमाणात मनुष्यहानी झाली; पण त्याकडे ब्रिटिश प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने ब्रिटिशांप्रती असंतोष निर्माण होऊन राष्ट्रवादाची वाढ होण्यास मदत झाली. १८६५-६६ या काळात ओरिसामधील काही जिल्ह्यांत दुष्काळामुळे फक्त १० टक्के लोक जिवंत राहिले. १८६८ ते १८७८ या दहा वर्षांत राजस्थानात एकपंचमांश लोकसंख्या मृत्युमुखी पडली. १८७६ ते १८७८ या काळात मद्रासमधील ३५ लक्ष तर म्हैसुरमधील १० लक्ष लोक दुष्काळामुळे मृत्यू पावले अशी आकडेवारी पी. एम. भाटिया यांच्या 'Famines In India' या ग्रंथात दिली आहे.

**१२ ) दळणवळणाची साधने -** १९ व्या शतकात ब्रिटिशांनी रेल्वे, टपाल, तारायंत्र व पक्क्या रस्त्यांची बांधणी आदी उपक्रम हाती घेतले. ब्रिटिशांच्या राजकीय व आर्थिक साम्राज्यवादाची पकड मजबूत करणे हा या सुधारणांचा हेतू होता. दळणवळणाच्या या सोयींचा फायदा भारतीयांनाही झाला. रेल्वे, रस्ते व तारायंत्रांमुळे प्रवास सुखाचा व जलद झाला. एकमेकांशी संपर्क साधणे शक्य झाले. विविध प्रांतांतील जनतेत भावनिक जवळीक निर्माण होण्यास मदत झाली. विविध प्रांतांतील नेतेमंडळी व कार्यकर्ते रेल्वेमुळे जलद विचारविनिमय करू शकले. त्यामुळे राष्ट्रवादाच्या विकासाला गती प्राप्त झाली. कार्ल मार्क्सनेही रेल्वेमुळे भारतात क्रांतिकारक बदल घडून येईल असे जे म्हटले होते त्याचे ते भाकीतही खरे ठरले.

**१३ ) लॉर्ड लिटनचे प्रतिगामी धोरण :-** इ. स. १८७६-८० या काळात लॉर्ड लिटन हा भारताचा व्हाईसरॉय होता. १८७६-७८ या दोन वर्षांत दुष्काळात ५० लक्ष माणसे मृत्युमुखी पडली; पण त्याने त्याकडे दुर्लक्ष केले. देशात भयंकर दुष्काळ असतानाही १८७७ मध्ये दिल्लीस भव्य दरबार भरवून त्याने स्वत:च्या वैभवाचे व सामर्थ्याचे प्रदर्शनच केले. १८७८ मध्ये देशी भाषिक वृत्तपत्रे कायदा पास करून वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्यावर निर्बंध घातले. १८७८ मध्येच शस्त्रबंदी कायदा पास करून भारतीयांना परवान्याशिवाय शस्त्र बाळगता येणार नाही हे स्पष्ट केले. इंग्लंडमधील स्पर्धा परीक्षेला बसण्याची वयोमर्यादा २१ वरून १९ वर आणली. कपड्यांच्या आयातीवरचा ५ टक्के आयातकर लिटनने बंद केल्याने भारतीय कापड उद्योगावर त्याचे वाईट परिणाम झाले. लॉर्ड लिटनच्या प्रस्तुत सर्व धोरणांचा परिणाम भारतीय शेतकरी, सर्वसामान्य जनता, व्यापारी, पत्रकार, उच्च सुशिक्षित अशा विविध क्षेत्रांतील लोकांवर झाला. बुच याने म्हटले की, 'लॉर्ड लिटनच्या दडपशाहीच्या धोरणामुळे भारतीय जनता झोपेतून जागी झाली व भारताची वाटचाल क्रांतिकारी स्फोटाकडे होऊ लागली.' सुरेंद्रनाथ बॅनर्जी म्हणतात, 'लॉर्ड लिटनची राजवट एक अर्थाने वरदानच ठरली. त्यांच्या धोरणामुळेच भारतीय जनता जागृत झाली व राष्ट्रीय आंदोलनात उतरली.'

**२० ) विदेशांतील राजकीय चळवळींचा व स्वातंत्र्य चळवळींचा प्रभाव :-** १७७६ चे अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध, फ्रेंच राज्यक्रांती १७८९, ग्रीस, बेल्जियम व आयर्लंडचा स्वातंत्र्याचा लढा, इटाली व जर्मनीचे एकीकरण, फ्रान्समधील तिसरे गणराज्य, इंग्लंडमधील सुधारणा कायदे, जपानची मेईजी क्रांती व त्यानंतर जपानचा झालेला कायापालट आदी सर्व गोष्टींचा प्रभाव राष्ट्रवादाच्या निर्मितीवर नक्कीच पडला होता.

**२१ ) ब्रिटिशांचे फोडा व झोडा धोरण :-** इ.स. १८५८ नंतर संस्थानिक विरुद्ध त्यांची प्रजा प्रांत विरुद्ध प्रांत गट विरुद्ध गट, हिंदू विरुद्ध मुसलमान अशी भांडणे लावून आपले फोडा व झोडा धोरण ब्रिटिशांनी पुढे चालू ठेवले. पण सुशिक्षित भारतीयांना ब्रिटिशांची ही नीती / धोरण समजले. त्याचा ब्रिटिशांवरील विश्वास उडाला. त्यातूनच राष्ट्रवादाच्या भावनेने जन्म घेतला.

वरील सर्व कारणांचा एकत्रित परिणाम म्हणून भारतात राष्ट्रवादाची भावना उदयास आली व तिचा उत्तरोत्तर विकास १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी झाला. भारतीय राष्ट्रवादाचा उदय व त्यांचे स्वरूप अरविंद घोष यांनी एका विस्तृत लेखात मांडले होते. **अरविंद घोष लिहितात,** 'भारतातील राष्ट्रवाद हा निराशेतून जन्मास आलेला संदेश कधीच नव्हता. तसेच जुलूमातूनही त्याचा जन्म झालेला नाही. - - - राष्ट्रवादाचा जन्म राष्ट्रसभेच्या मंडपात झालेला नाही, तो मुंबईच्या प्रेसिडेन्सी असोसिएशनमध्ये झालेला नाही, शहाणे अर्थशास्त्रज्ञ व विद्वान सुधारक यांच्या संघर्षातूनही तो झालेला नाही. त्याचा जन्म श्रीकृष्णाप्रमाणे बंदिखान्यात झालेला आहे. देशातील अनियंत्रित पण उदार सुराज्याखालचा हिंदुस्थान हा ज्यांच्या अंतःकरणाला तुरुंगातील अंधार कोठडीप्रमाणे असह्य वाटत होता, त्यांच्या अंतःकरणात याचा जन्म झाला होता. श्रीकृष्णाची वाढ ज्याप्रमाणे राजदरबारी झाली नाही किंवा ब्राह्मणांच्या पाठशाळेत त्याचे ज्ञान वाढले नाही, त्याप्रमाणे हा राष्ट्रवाद संन्याशाच्या गुहेत, फकिरांच्या वेशात, तरुण लोकांच्या व मुलांच्या अंतःकरणात; ज्यांना इंग्रजी शब्दही उच्चारता येत नाही, परंतु ज्यांना आपल्या मातृभूमीकरिता त्यागपूर्वक काम करावे असे वाटत होते, त्यांच्या अंतःकरणात, ज्या सुशिक्षितांनी हा मंत्र ऐकताच संपत्तीचा आणि मानमरातबाचा त्याग करून लोकसेवेसाठी आणि लोकजागृतीसाठी देशसेवेचे व्रत अंगीकारीले अशांच्या जीवनात या राष्ट्रवादाची वाढ हळूहळू झालेली आहे.'

अरविंदांचे हे मत पूर्णपणे बरोबर नाही. कारण भारतीय राष्ट्रवादाच्या निर्मितीत ब्रिटिश राजवटीबद्दल निराशा, जुलूमशाही व काँग्रेसपूर्व अस्तित्वात असलेल्या विविध संघटनांनी केलेली जागृती यांचा सिंहाचा वाटा होता यात शंकाच नाही. राष्ट्रवादाच्या निर्मितीत इंग्रजी जाणणाऱ्या पहिल्या पिढीचे योगदान मोठेच होते.

### ३) भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना :-

**अॅलन ऑक्टोव्हिअन ह्यूम व त्यांची भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेबाबतची भूमिका :-** १८७० ते १८९० या काळात ए. ओ. ह्यूम हे भारत सरकारच्या गृहखात्याचे सचिव होते. गृहखात्याचे सचिव या नात्याने भारतातील विविध प्रांतांतील असंतोष, उपासमार, दारिद्र्य व सशस्त्र दंगे या सर्व गोष्टींची कल्पना ह्यूम यांना होती. १८५७ च्या उठावानंतरही सशस्त्र उठाव भारतात होत होतेच. उदा. मलबारातील मोपला शेतकऱ्यांचा उठाव, वासुदेव बळवंत फडक्यांना केलेले उठाव, नगर-नाशिक भागात रामोशी व भिल्लांचे उठाव, नीळ मळेमालकांविरुद्ध बंगालमधील उठाव हे उठाव स्थानिक असले तरी जनतेच्या मनात असंतोष खदखदत आहे हे ह्यूमला माहीत होते. हा असंतोष मध्यमवर्गीय सुशिक्षित वर्गातही होता व तो वृत्तपत्रांच्या माध्यमातून व्यक्त होत होता. सुशिक्षित मध्यमवर्गात निर्माण झालेली राष्ट्रवादाची भावना याचीही ह्यूमला जाणीव होती. सुशिक्षित मध्यमवर्गीयांचे समर्थन जर ब्रिटिश शासनाला मिळत नसेल तर ब्रिटिश सरकार धोक्यात येऊ शकते याची स्पष्ट जाणीव ह्यूमला होती. याच पार्श्वभूमीवर ह्यूम यांनी १ मार्च १८८३ रोजी कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीधरांना उद्देशून एक अनावृत पत्र लिहिले (भाषण केले) व त्यात वैयक्तिक स्वार्थ व उन्नती तसेच सुखासीन जीवनाचा मोह सोडून देशहितासाठी – सार्वजनिक कार्यासाठी प्रेरित झालेले चारित्र्यवान, कर्तबगार व निरलस ५० तरुण पुढे आले तर भारताच्या उन्नतीचा मार्ग सुकर होईल अशी आशा प्रकट केली. ह्यूमने हिंदुस्थानी लोकांची मानसिक, नैतिक, सामाजिक व राजकीय प्रगती साधण्यासाठी देशव्यापी संघटना स्थापन करण्याचे आवाहन केले होते. ह्यूमच्या य आवाहनाला बंगालच्या सुशिक्षितांनी उत्तम प्रतिसाद दिला. ह्यूमने त्यांच्या सहकार्यानेच 'इंडियन नॅशनल युनियन' या नावाची संघटना स्थापन केली. या संघटनेच्या शाखा एका वर्षातच सुरत, कराची, अहमदाबाद, मुंबई, अलाहाबाद, बनारस आदी मोठ्या शहरांत स्थापन झाल्या.

ह्यूम यांनी 'इंडियन नॅशनल युनियन' स्थापन करण्यापूर्वी भारताविषयी सहानुभूती असलेल्या लॉर्ड नॉर्थब्रुक, लॉर्ड रिपन, जॉन ब्राईट यांची भेट घेऊन सुशिक्षित भारतीयांची एक राष्ट्रीय संघटना स्थापन करण्याची योजना त्यांच्यापुढे मांडली होती व त्यास मान्यता मिळवली होती. ह्यूम यांचा काँग्रेसशी संबंध १९०७ पर्यंत कायम होता. **ह्यूम यांच्या मते** 'ब्रिटिशांच्या राजवटीविषयी भारतीयांची मते अजमावण्याचे काँग्रेस हे एक प्रभावी साधन आहे.'

**लॉर्ड डफरीनची काँग्रेसच्या स्थापनेबाबत भूमिका :-**

भारतातील ब्रिटिश व्हाईसरॉय लॉर्ड डफरीन यानेही इंडियन नॅशनल युनियनच्या स्थापनेस अनुकूलता दर्शविली होती. इंडियन नॅशनल युनियन (सभा) स्थापन करण्यास लॉर्ड डफरीन यांनी परवानगी दिली नसती तर कदाचित ह्यूम यांनी काँग्रेसची स्थापना केलीही नसती. म्हणूनच "If Hume is the father of Indian National Congress,

आपल्याला वाटले होते; तथापि काँग्रेसने मात्र अशा विषयांचा विचार न करता सरकारला न रुचणाऱ्या विषयांचा खल सुरू केला आहे.' या विधानावरून काँग्रेस फक्त सामाजिक क्षेत्रातच काम करेल असा डफरीनचा अंदाज होता. भारतीय सुशिक्षित मध्यमवर्गीयांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले तर त्यांच्या मनातील असंतोषाची भावना कमी होऊ शकते, म्हणून काँग्रेसची निर्मिती करण्यात ब्रिटिशांनीच पुढाकार घेतला असे मत सी. एफ. अँण्ड्र्यूज व गिरिजाभूषण मुखर्जी यांनी 'Rise and Growth of Congress In India' या ग्रंथात मांडले आहे. योगेशचंद्र बॅनर्जी यांनीही 'Indian Politics' या ग्रंथात सुरक्षा झडपेचा सिद्धांत स्वीकारला आहे. सी.एफ. एड्र्यूज, आर. सी. मुजुमदार, ताराचंद, लाला लजपतराय यांनीही याच सिद्धांताची पाठराखण केली होती पण यांनी हा सिद्धांत अभ्यासपूर्ण पद्धतीने खोडला आहे. हेच मत 'Safety Valve Theory' या नावाने ओळखले जाते.

**लाला लजपतराय** यांनीही म्हटले होते की, 'स्वातंत्र्याच्या आकांक्षेने प्रेरित होऊन काँग्रेसची स्थापना करण्यात आली नाही तर काँग्रेस संस्थापकांचा प्राथमिक उद्देश ब्रिटिश साम्राज्याला उपस्थित झालेला धोका नाहीसा करण्याचा होता.' ह्यूमसारखा एक ब्रिटिश अधिकारीच काँग्रेसची स्थापना करण्यात पुढाकार घेतो हे पाहून तत्कालीन भारतीय नेते त्यास सहकार्य करण्यासाठी पुढे सरसावले होते.

**ना. गोपाळ कृष्ण गोखले** यांनी मांडलेले पुढील मत अत्यंत तर्कशुद्ध व वस्तुनिष्ठ आहे. ते म्हणतात, 'देशातील त्या काळातील विद्यमान परिस्थिती लक्षात घेता कोणत्याही भारतीय व्यक्तीच्या पुढाकाराने कायमस्वरूपाची राजकीय संघटना स्थापन होणे अशक्य होते.' कारण तसा प्रयत्न साम्राज्यवादी ब्रिटिश नोकरशाहीने मुळातच चिरडून टाकला असता. ह्यूम यांच्या या संघटनेला ब्रिटिशांचा पूर्ण पाठिंबा होता व राजकीय स्वातंत्र्य मिळवणे हे प्रारंभीच्या काळातील काँग्रेसचे ध्येय मुळीच नव्हते. ब्रिटिश शासनाबाबतचा भारतीयांच्या मनातील असंतोष दूर करून सनदशीर मार्गाने भारताची प्रगती घडून आणावी हेच काँग्रेसच्या स्थापनेमागचे सूत्र होते असा निष्कर्ष निघतो. वास्तविक सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांच्या नॅशनल कॉन्फरन्सचे अधिवेशन डिसेंबर १८८५ मध्ये भरणार असतानाही ह्यूम यांनी त्याचे खच्चीकरण करून ब्रिटिशांशी एकनिष्ठ असलेल्या भारतीयांची संघटना स्थापन केली होती. **डॉ. आर. सी. मुजुमदार** यांनी 'The British Paramountcay and Indian Renaissance' या ग्रंथात सुरेंद्रनाथ बॅनर्जी हे जहाल होते, त्यांचे नाव सरकारने तयार केलेल्या काळ्या यादीत टाकलेले होते, ह्यूमला व खुद्द काँग्रेसमधील काही नेत्यांना त्यांची विचारसरणी पटत नव्हती म्हणूनच त्यांना काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनाचे निमंत्रणही फारच उशिरा दिले गेले. लॉर्ड डफरीनच्या मनातही सुरेंद्रनाथ बॅनर्जींबद्दल चीड होती आदी गोष्टी स्पष्ट केल्या आहेत.

**डॉ. नंदलाल चटर्जी** यांनी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात रशिया भारतावर आक्रमण न अशी भीती इंग्रजांना वाटत होती. या आक्रमणास तोंड देण्यासाठी भारतीय जनतेची